ePaper

**“राज्याचा मुख्यमंत्री बदला...” वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांची मागणी**



| वर्ष - 8 । अंक - 222 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 27 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- मुंबईचा युपीवर दणदणीत विजय!
- मी लोकप्रियत धोनीला मागे टाकेन!
- दिव्यांग युवकांना रोजगार मिळणार
- पोलीस दलात आंदोलनाची ठिणगी !


## पुणे हादरले ! यार्डमधील बसमध्ये युवतीवर बलात्कार !

# स्वारगेट डेपोत लिंगपिसाटाचा हैदोस!

### » यार्डमधील बंद बसेस ‘लॉजिंग’ ; सापडले कंडोम्स !

। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**संपूर्ण पुण्याला आणि पुणे जिल्ह्याला हादरवून टाकणारी दुर्दैवी घटना स्वारगेट बस स्टँडवर घडली. तेथील यार्डमध्ये उभ्या असलेल्या ‘शिवशाही’ बसमध्ये एका नराधम लिंगपिसाटाने २६ वर्षाच्या युवतीवर बलात्कार केला. या घटनेमुळे संपूर्ण शहर हादरले असून तेथील २३ सुरक्षा रक्षकांना निलंबित केल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे.**



दरम्यान, या परिसरात अत्याचार आणि बलात्कार अशी प्रकरणे नवीन नसून रोजच अनेक नराधम येथे हैदोस घालत असल्याचा आरोप होत आहे. शिवसेनेच्या उबाठा गटाचे नेते वसंत मोरे यांनी तर यार्डमधील उभ्या बसेस म्हणजे लॉजिंग असून तेथे कंडोम्स चा ढीग पडला असल्याचे सांगितले. त्यांच्या कार्यकर्त्यांनी सुरक्षारक्षकांच्या केबिन पण फोडल्या. फलटणला जाणारी युवती पहाटेच्या सुमारास स्वारगेट बस स्टॅन्डमध्ये उभी होती. तिची चौकशी करून आणि तिला ‘ताई’ म्हणत एका वासनांधाने तिला फसवून एका ‘शिवशाही’ गाडीमध्ये नेले आणि तिच्यावर पाशवी बलात्कार केला. पोलीस चौकीत गुन्हा नोंद झाला असून पोलिसांच्या तुकड्या या नराधमाचा शोध घेत आहे. या आरोपीवर पूर्वीसुद्धा गुन्हे दाखल आहेत.

### 23 सुरक्षारक्षक निलंबित

सरकारने तातडीची पावले उचलली असून तेथील २३ सुरक्षारक्षकांना निलंबित करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रूपाली चाकणकर, रूपाली ठोंबरे, उबाठाचे वसंत मोरे यांनी घटनास्थळी भेट घेऊन संतप्त प्रतिक्रिया दिल्या आहेत. राज्याच्या मंत्री माधुरीताई मिसाळ यांच्यासह सर्व सत्ताधारी पक्षाच्या आमदारांच्याही संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. अशा नराधमांना वेळीच ठेचायला हवे, आणि असे खटले अतिजलद न्यायालयात चालवून त्यांना फाशीपर्यंत कसे नेता येईल, ते पाहायला हवे, अशी संतप्त भावना या नेत्यांनी आणि नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### सीसीटीव्ही फुटेज हाती

या आरोपीचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले असून तो शिरूरचा असल्याचा सुगावा लागला आहे. त्या दृष्टीने पोलिसांची पथकेही रवाना झाली आहेत.

### बसेस कसल्या? लॉजिंगच्या रुम्स..

स्वारगेट यार्डमध्ये उभ्या असलेल्या बसेसचा वापर लॉजिंगच्या रूम्ससारखा होत असल्याचे वसंत मोरे म्हणाले. या बसेसचा लैंगिक अत्याचार आणि कामांधांची वासना, शारीरिक भूक शमवण्यासाठी उपयोग होतो. तेथे अनेक कंडोम्स पडल्याचेही त्यांनी दाखवले. पोलिसांनी तातडीची पावले उचलावीत आणि आरोपीला गजाआड करावे, अशी सर्वपक्षीय मागणी होत आहे.

## तीन हजार कोटींचा ‘एलबीटी’ थकीत

### » पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकांपुढे वसुलीचा प्रश्न

। पिंपरी । महाईन्यूज

**राज्य सरकारने महापालिकांना स्थानिक संस्था कर विभाग (एलबीटी) बंद करण्याचा आदेश दिला आहे. या आदेशामुळे पुणे महापालिकेच्या हद्दीतील व्यापाऱ्यांकडे असलेली २०० कोटी रुपयांची, तर पिंपरी-चिंचवडमधील उद्योजक, व्यापाऱ्यांकडे असलेल्या २८०० कोटी रुपयांच्या थकबाकीचा प्रश्न निर्माण झाला आहे.**



केंद्र शासनाने देशात वस्तू व सेवाकराची अंमलबजावणी १ जुलै २०१७ पासून सुरू केल्यामुळे जकात, स्थानिक संस्था कर रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे हा विभाग बंद करण्याचा आदेश राज्य सरकारने दिला आहे. मात्र, दोन्ही महापालिका हद्दीतील व्यापाऱ्यांकडे स्थानिक संस्था कराची कोट्यवधी रुपयांची थकबाकी आहे. हा विभाग बंद झाल्यास या थकबाकीवर पाणी सोडावे लागण्याची भीती दोन्ही महापालिकांच्या अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. पुणे महापालिकेची एलबीटीची २०० कोटी रुपयांची, तर पिंपरी-चिंचवड महापालिकेची २८०० कोटी रुपयांची थकबाकी शहरातील व्यापारी, उद्योजकांकडे आहे.

### पुण्यात 200 कोटींची थकबाकी

महापालिकेकडून एलबीटीची आकारणी केली जात असताना अनेक व्यापाऱ्यांनी हा कर भरलेला नाही. जीएसटी सुरू झाल्यानंतर ही थकबाकी आहे. व्यापाऱ्यांकडे सुमारे २०० कोटी रुपयांची थकबाकी आहे. राज्य सरकारच्या आदेशामुळे या थकबाकीच्या रकमेवर पाणी सोडावे लागण्याची भीती सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी व्यक्त केली.

### पिंपरी-चिंचवडमध्ये 2800 कोटी थकीत

पिंपरी-चिंचवड महापालिकेची व्यापाऱ्यांकडे तब्बल २८०० कोटी रुपयांची थकबाकी आहे. व्यापाऱ्यांना नोटीस दिली आहे. त्यातून दोन हजार ८०३ कोटींचा मूळ कर थकीत असल्याचे स्पष्ट झाले. थकबाकी वसुलीसाठी महापालिकेने शासनाकडे अभय योजनेला मान्यता देण्याची मागणी केली.

## ‘शिवशाही’ नाव असलेल्या बसमध्येच बलात्कार

# बलात्कारी आरोपीचा ‘चौरंग’ करा!

## अन्यथा छत्रपतींचे नाव घेऊ नका; मनसेच्या सरचिटणीस शालिनी ठाकरे यांची टीका

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात बुधवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास एका तरुणीवर बलात्काराची धक्कादायक घटना घडली. आरोपीने तरुणीची दिशाभूल करत तिला मोकळ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये बसण्यास भाग पाडले आणि त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. आरोपीचे नाव दत्तात्रय गाडे असल्याची ओळख पटविण्यात आली असून पोलिसांची आठ पथके त्याच्या शोधासाठी रवाना झाली आहेत.**



या घटनेचे पडसाद आता पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात उमटले असून राजकीय पक्षांनी स्वारगेट डेपोमध्ये आंदोलनही केले आहे. आता मनसेनेही या प्रकरणात भूमिका मांडली असून ‘शिवशाही’ नावाच्या बसमध्ये बलात्कार होत असेल तर आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचा अधिकार आहे का? असा प्रश्न उपस्थित केला आहे. पुण्यातील संतापजनक घटनेनंतर मनसेच्या सरचिटणीस शालिनी ठाकरे यांनी एक्सवरील पोस्टमध्ये रोष व्यक्त केला. त्या म्हणाल्या, “महाराजांच्या काळात महिलेवर अत्याचार करणाऱ्यांचा ‘चौरंगा’ केला जायचा. आज ‘शिवशाही’ नाव असलेल्या बस मध्ये एका महिलेवर अत्याचार होतो?? लाज वाटली पाहिजे छत्रपतींच्या नावावर राजकारण करणाऱ्यांना... माझे सरकारला आव्हान आहे, आरोपीला शोधून त्याचा ‘चौरंग’ करा नाहीतर छत्रपतींचे नाव घेऊ नका.”

### कायद्याचा धाक उरलेला नाही

दरम्यान बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही या घटनेबाबत संताप व्यक्त केला. एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले, “स्वारगेटसारख्या गजबजलेल्या बस स्थानक परिसरात एका तरुणीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे स्वारगेट बस स्थानकाच्या जवळच पोलीस चौकी आहे. शिवाय पोलीस कर्मचारी बस स्थानकावर वेळोवेळी गस्त घालत असतात. तरीही अशा पद्धतीचा घृणास्पद गुन्हा करण्याची आरोपीची हिंमत होते ही बाब गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरलेला नाही हे दर्शविणारी आहे.”

शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते वसंत मोरे यांनी स्वारगेट बस डेपोत धडक देत सुरक्षा रक्षक कार्यालयाची तोडफोड केली. तसेच स्वारगेट स्थानकात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती गंभीर झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. डेपोत उभ्या असलेल्या बसेसमध्ये लॉजिंग सुरू करण्यात आले असल्याचा आरोप त्यांनी केला. आगार प्रमुखांचे निलंबन केले पाहिजे आणि सुरक्षा रक्षकांवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी वसंत मोरे यांनी केली.

## सरकार झोपले आहे : आ. जितेंद्र आव्हाड

## महिलांची सुरक्षितता रसातळाला गेल्याची परिस्थिती

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहरातील स्वारगेट येथील बसस्थानकावर शिवशाही बसमध्ये एका तरूणीवर बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बुधवारी सकाळी साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली. पोलिसांनी आरोपीचे नाव उघड केले असून त्याचा शोध घेण्यास पोलिसांची आठ पथके रवाना झाली आहेत. दत्तात्रय रामदास गाडे असं या प्रकरणातल्या आरोपींचं नाव आहे.**



दरम्यान या धक्कादायक घटनेचे पडसाद सध्या राजकीय वर्तुळात उमटताना दिसत आहेत. विरोधकांकडून सत्ताधारी पक्षांवर जोरदार टीका केली जात आहे. यादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या बलात्काराच्या घटनेवर सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केली आहे. “शांत......... सरकार झोपले आहे,” असे म्हणत या पोस्टमधून त्यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. आव्हाडांनी त्यांच्या पोस्टमध्ये आव्हाडांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच पीडित मुलीला झालेला प्रकार कुणाला तरी सांगावा वाटला नाही यात समाज म्हणून आपल्या सर्वांचा पराभव आहे असेही आव्हाड म्हणाले आहेत.

“राज्यातील पोलीस प्रशासनाची संवेदनशीलता आणि महिलांची सुरक्षितता रसातळाला गेल्याची परिस्थिती आहे. स्वारगेट बसस्थानकात तरुणीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेला कित्येक तास उलटून गेले तरी आरोपी अजून पोलिसांच्या हाती लागलेला नाही. याउलट पोलीस प्रशासन पीडित तरुणीलाच दोष देण्याचं काम करत आहे. घडलेल्या प्रसंगानंतर तरुणीची मानसिक स्थिती काय असेल याची एकुलत्या एका मुलीचा बाप म्हणून कल्पनाही करवत नाही. झाला प्रकार या तरुणीला लगेच कुणाला तरी सांगावा वाटला नाही यात आपल्या सर्वांचा समाज म्हणून मोठा पराभव आहे. सार्वजनिक ठिकाणी सुद्धा महिला असुरक्षित आहेत आणि या प्रसंगाच्या निमित्ताने महिला सुरक्षेचे अनेक प्रश्न उभे राहतात,” असे म्हणत आव्हाडांनी स्वारगेट बस स्थानकातील प्रशासकिय व्यवस्थेबद्दलच्या काही समस्या मांडल्या आहेत. मुख्यमंत्री जितेंद्र आव्हाड यांच्यावरही टीका केली आहे. “मुळात एखादा गुन्हा घडल्यानंतर पीडित व्यक्तीला पोलिसांकडे जाण्याची भीती वाटत असेल, तर पोलीस नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आहेत ही एक अफवाच उरते. मुख्यमंत्री असलेल्या गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक या दोघांसाठीही ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. पोलिसांकरवी थातूर-मातूर उत्तरे देऊन वेळ मारून नेण्यापेक्षा पोलीस खात्यातील आणि राज्य परिवहन महामंडळातील संबंधित अधिकाऱ्यांवर तत्काळ कठोर कारवाई झाली पाहिजे.

### पोलीस रात्रभर गस्त का घालू शकत नाहीत?

1) स्वारगेटचे नेहमीचे प्रवासी सांगतात की, स्वारगेट बस स्थानकात रात्री पुरेसा प्रकाश नसतो. 2) बस गाड्या नियोजित फलाटावर लागत नाहीत. 3) आगार व्यवस्थापक चौकशीसाठी येणाऱ्या प्रवाशांना व्यवस्थित माहिती देत नाहीत. 4) रात्री मुक्कामी असणारी बस लॉक का नव्हती? 5) घटनास्थळापासून स्वारगेट पोलीस स्टेशन अवघ्या हाकेच्या अंतरावर असूनही तिथे पोलीस रात्रभर गस्त का घालू शकत नाहीत?

# पिंपरी चिंचवड शहरातील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न ऐरणीवर!

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचा महापालिका प्रशासनाला इशारा

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मागील दीड महिन्यापासून महानगरपालिकेने भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्ताचे काम पूर्णपणे थांबवले आहे. त्यामुळे शहरातील विविध भागांत कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून, अनेक ठिकाणी नागरिकांवर हल्ल्याच्या घटना घडत आहेत.**



या परिस्थितीचा आढावा घेत राष्ट्रवादी युवक काँग्रेस – शरदचंद्र पवार पक्षाचे युवक पदाधिकारी मंगेश असवले यांनी प्रदेश उपाध्यक्ष विशाल वाकडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना पत्र देऊन जाब विचारला आणि तातडीने कारवाईची मागणी केली.

### महापालिकेच्या निष्क्रियतेमुळे नागरिक त्रस्त

शहरातील भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे लहान मुले, महिला, वृद्ध आणि दुचाकीस्वार मोठ्या प्रमाणात बाधित होत आहेत. काही ठिकाणी गंभीर जखमा होण्याच्या घटना घडल्या असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय, कुत्र्यांच्या चावण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने रेबीज आणि इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत आहे.

महापालिकेने वेळोवेळी कुत्र्यांच्या धरपकडीसाठी आणि नसबंदी मोहिमेवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला असल्याचे सांगितले जाते, परंतु प्रत्यक्षात नागरिकांना त्याचा काहीही फायदा होत नाही. उलट, समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे.

### राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने ही मागणी..

शहरभर भटक्या कुत्र्यांची तातडीने धरपकड सुरू करावी. नागरिकांच्या सुरक्षेसाठी विशेष टास्क फोर्स तयार करावा. नियमित लसीकरण व नसबंदी मोहिम सुरू करावी. शहरातील प्रमुख भागांमध्ये कुत्र्यांसाठी स्वतंत्र निवासस्थाने व फीडिंग झोन तयार करावेत. नागरिकांच्या तक्रारींसाठी २४ तास कार्यरत हेल्पलाईन सुरू करावी. युवक पदाधिकारी मंगेश असवले यांनी महापालिकेला जर ठोस कारवाई नाही झाली, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

> “महापालिकेने शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे. केवळ आश्वासनांवर वेळ न दवडता तातडीने ठोस कारवाई करावी. अन्यथा, आम्ही रस्त्यावर उतरून प्रशासनाला जाग आणू..!”
>
> **– मंगेश असवले,**
> युवक पदाधिकारी, राष्ट्रवादी युवक काँग्रेस – शरदचंद्र पवार पक्ष.

---

# तीन दिवस पिंपरी-चिंचवड शहर रामभरोसे?

## आयुक्तांसह, वरिष्ठ अधिकारी शहर धोरणावर चर्चेसाठी शहराबाहेर !

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्यासह अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त यांच्यासह आदी 50 वरिष्ठ अधिकारी मुळशीतील ताम्हिणी घाटात असणाऱ्या गरुडमाचीवर शहर धोरणावर चर्चा करण्यासाठी रवाना होणार आहेत.**




तीन दिवसांच्या या निवासी कार्यशाळेचे दि.२८ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. महत्त्वाचे म्हणजे या तीन दिवसांच्या कार्यशाळेसाठी तब्बल ८ लाख ५४ हजार ३२० रुपयांची उधळपट्टी करण्यात येणार आहे


या निवासी कार्यशाळेसाठी आयुक्तांसह सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी शुक्रवारी (दि. २८) दुपारी दोन नंतर ताम्हिणी घाटातील गरुडमाचीकडे रवाना होणार आहेत हे ठिकाण शहरापासून साधारण ७५ किलोमीटर अंतरावर आहे. तीन दिवस अधिकारी येथे मुक्कामी असणार आहेत. त्यामुळे तीन दिवस शहर रामभरोसे राहणार आहे.

### कार्यशाळा कशासाठी ?



स्मार्ट सिटी, मेट्रो सिटी पर्यंत पोहोचलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापनेस २०३२ मध्ये ५० वर्षे पूर्ण होत आहे. त्यानिमिताने महापालिकेने “व्हिजन ५० शहर धोरण” हा उपक्रम हाती घेतला आहे. पिंपरी चिंचवड शहराचे नागरिकरण या पुढील काळात प्रचंड प्रमाणात वाढणार आहे. आजमीतिला शहराची लोकसंख्या चाळीस लाखांच्या टप्प्यावर आहे. आगामी काळात पाणी, रस्ते,आरोग्य या मूलभूत गरजांशिवाय शहराला आणखी काय हवे आहे ?याची घडी कशी बसवता येईल? मूलभूत समस्या व्यतिरिक्त शहराच्या गरजा कशा वाढणार आहेत यावर साधकबाधक चर्चा करण्यात येणार आहे. त्यावरून शहर विकासाचे धोरणही ठरवले जाईल. यासाठी तीन दिवसांच्या निवासी कार्यशाळेचे दि.२८ दि.२ मार्च या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेवर कामगार कल्याण विभागाच्या लेखाशिर्षावरील ८ लाख ५४ हजार ३२० रुपयांची उधळपट्टी करण्यात येणार आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### कोणत्याही परिस्थितीत नामस्मरण शक्य आहे !

मनुष्याची सर्व धडपड शाश्वत समाधान मिळविण्यासाठी चालू असते. ते समाधान फक्त भगवंताजवळ असल्याने समाधानासाठी प्रत्येक माणसाला भगवंताची गरज आहे. आपल्या सर्व धडपडीतून भगवंताच्या प्राप्तीचे समाधान आपल्याला मिळत नाही; आणि त्याला परिस्थिती कारणीभूत आहे, असे सर्वजण सांगतात. पण खरोखरच परिस्थिती आड येते किंवा काय हे आपण बघितले पाहिजे. परिस्थितीसंबंधी विचार करताना एक बाह्य परिस्थिती आणि दुसरी आंतर-स्थिती यांचा विचार करावा लागेल. बाह्य परिस्थितीचा विचार करताना प्रथम आपली शरीरप्रकृती आड येते. ही प्रकृती कशीही असली तरी भगवंताचे स्मरण आपल्याला करता येईल की नाही ? प्रकृतीला कितीही क्षीणत्व आले, देहाला कितीही विकलता आली, तरी अंतकाळी भगवंताचे स्मरण करता येते, असे भगवंताने गीतेत सांगितले आहे. देहाची अवस्था कोणतीही असली, तरी त्यामध्ये नामस्मरण करता येत नाही हे म्हणणे काही बरोबर नाही. तेव्हा, प्रकृती आड येते असे म्हणणे कितपत संयुक्तिक ठरेल ? पुष्कळ लोक आर्थिक अडचणींसंबंधी कुरकूर करतात. पैसा नसल्याकारणाने प्रपंचात काळजी उत्पन्न होऊन भगवंताकडे लक्ष द्यायला सवडच मिळत नाही असे बरेचजण सांगतात. पण खरोखर तुम्ही मला सांगा, जगात भरपूर धन मिळवून वैभवाच्या शिखरावर पोहोचलेले कितीसे लोक नामस्मरण करतात ? आजपर्यंत किती राजे लोक आपले राजवैभव लाथाडून भगवंताच्या प्राप्तीसाठी बैरागी झाले ? आपल्याजवळ पैसा नसणे हे भगवंताच्या प्राप्तीच्या आड येते हे म्हणणे बरोबर नाही. उलट पैसा हा भगवंताची निष्ठा फार कमी करतो. पैसा असला की आपल्याला एक आधार आहे असे वाटते. म्हातारपणी आपल्याला उपयोगी पडावा म्हणून पैसा साठवायचा प्रयत्न करावा, तर मी म्हातारपणापर्यंत जगेन याची खात्री कोणी द्यावी ? सुख, समाधान हे पैशावर अवलंबून नाही. प्रत्येकाची गोतावळी ठरलेली आहे. वेताळाची स्वारी निघाली की त्याच्याबरोबर पिशाच्चे निघायचीच; आणि भगवंताची स्वारी निघाली की त्याच्याबरोबर दया, क्षमा आणि जिकडेतिकडे आनंदी वृत्ती ही असायचीच. त्याचप्रमाणे पैसा आला की त्याच्याबरोबर तळमळ, लोभ, असमाधान ही यायचीच. परस्त्री एखादे वेळी विषयभोगामध्ये आपल्याला सामील होणार नाही, पण पैसा मात्र आपण वापरू तसा वापरला जातो. बाप-मुलगा, भाऊ-भाऊ, भाऊ-बहीण, मित्र-मित्र यांच्यामध्ये वितुष्ट आणायला कारण काही असेल तर पैसाच होय.

**बोधवचन:- आपण पैसा साठविला तर गैर नाही, पण त्याचा आधार न वाटावा. अनुसंधानाच्या आड त्याला येऊ देऊ नये.**

# कसं काय पाटील, बरं हाय का ?



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**
संस्थापक, संपादक



**राष्ट्रवादी काँग्रेसची छकले झाल्यानंतर शरद पवार गटाची धुरा यशस्वीपणे आणि खंबीरपणे वाहणारे जयंत पाटील..त्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष..पण, गेल्या काही दिवसात त्यांच्याबद्दल जे ऐकायला मिळते ते अनाकलनीय आणि अतर्क्य म्हणावे लागेल ! जयंत रावांचा एक पाय राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तर दुसरा पाय भारतीय जनता पार्टीच्या उंबरठ्याच्या आत आहे, हे जवळजवळ प्रत्येकाला समजून चुकले आहे..अगदी शरद पवारांना सुद्धा !**

वास्तविक, राजकारणात एखाद्यावर संशय घेतला गेला, तर तो नेता थोडी सावधानतेची भूमिका बाळगतो..पण, जयंत पाटील मात्र बिनधास्तपणे वावरत असतात आणि टोलेबाजी ही करत असतात.

### रात्रीस खेळ चाले..

तसे पाहिले तर भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्रातील 'सर्वेसर्वा' देवेंद्र फडणवीस, जयंतरावांच्या पक्षाच्या दुसऱ्या गटाचे नेते अजित पवार, माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सर्व ज्येष्ठ नेते जयंतरावांच्या अगदी जवळचे मानले जातात. आणि हे सर्वजण राजकारणात एवढे ज्येष्ठ आहेत की प्रत्येकाच्या मनात काय, प्रत्येकाची भूमिका काय? हे जग जाहीरच म्हणावे लागेल.

### ताकाला जाऊन भांडे का लपवायचे?

मग, असे असताना जयंतराव हे नेहमी संदिग्ध भूमिकेत का वावरतात? हा खरा प्रश्न आहे. वास्तविक, फार पूर्वी म्हणजे अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेस मधून बाहेर पडण्यापूर्वी जयंतरावांनी भाजपाशी संधान बांधले होते आणि ते कोणत्याही क्षणी भाजपामध्ये प्रवेश करतील अशी आवई उठवली गेली होती, हा इतिहास अगदी ताजा आहे. पण, कदाचित ते लक्षात आल्यामुळेच असावे, शरद पवार यांनी जयंतरावांच्याकडे थेट प्रदेशाध्यक्षपद सोपवून त्यांचा भाजपाचा मार्ग रोखला असावा !

परंतु, या घटनेनंतर आता बरेच दिवस झालेत.. राजकारणाच्या प्रवाहाचे बरेच पाणी पुलाखालून वाहून गेले आहे. महाराष्ट्रामध्ये आता पाच वर्षे भाजपा हालत नाही, केंद्रामध्ये भाजपा पाच वर्षे अशीच राहणार, हे सर्वांना माहीत आहे. त्यामुळेच बहुतेकांनी सुरक्षित क्षेत्र म्हणून भाजपा किंवा त्यांच्या सहयोगी पक्षांमध्ये प्रवेश करून स्वतःला सुरक्षित ठेवण्याचा मार्ग अवलंबला असावा, म्हणूनच जयंतरावांचे नियोजन कोणाच्या लक्षात येत नाही.

### प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांची भेट

हा सर्व गोंधळ आणि या प्रकारच्या राजकीय चर्चा सुरू असतानाच जयंतरावांनी भाजप प्रदेशाध्यक्ष आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची दोन दिवसांपूर्वी रात्री उशिरा भेट घेतल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आणि पुन्हा त्यांच्या भाजपामधील प्रवेशाच्या चर्चेला ऊत आला. मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या उपस्थितीत तासभर ही भेट चालल्याची माहिती समोर आल्याने जयंतराव यांच्या राजकीय भूमिकेबाबत उलटसुलट चर्चांनाही सुरुवात झाली. अखेर स्वतः जयंतरावांनी ही भेट झाल्याचे मान्य करतानाच सांगली जिल्ह्यातील कामांची निवेदने देण्यासाठी भेट घेतल्याचा खुलासा करत राजकीय चर्चांवर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात त्यांच्या या बोलण्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही, कारण, पक्ष सोडणे किंवा नवीन पक्ष जोडणे या कालखंडात कोणीही एक दुसऱ्याला काही कामानिमित्त भेटलो असेच सांगत असतो.

### जयंतरावांची नवीन राजकीय भूमिका

जयंतरावांना निवेदनच द्यायचे होते, तर मग ते दिवसाही देऊ शकले असते. त्यासाठी रात्रीची वेळ कशाला ? हा मुद्दा अनुत्तरीतच राहतो. जयंतराव हे नवी राजकीय भूमिका घेणार असल्याच्या चर्चा अधूनमधून नवे हल्ली रोजच सुरू असतात. विशेषतः, शरद पवार गटात प्रदेशाध्यक्षपदावरून सुरू असलेली धुसफूस, रोहित पवार आणि त्यांच्या समर्थकांकडून याबाबत घेतली जाणारी भूमिका यामुळे जयंतराव वेगळा विचार करणार असल्याच्या वावड्या उडत असतात म्हणून जयंतरावांनी बावनकुळे यांची घेतलेली भेट चर्चेच्या केंद्रस्थानी आहे.

### जयंतरावांची सारवासारव

या भेटीत कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही. तरीही प्रसारमाध्यमे अशा प्रकारच्या बातम्या बनवितात, हे खेदजनक आहे, असे म्हणत या भेटीबाबत जयंतरावांनी सारवासारव केली आहे खरी, पण कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्या पक्षांतराविषयी नक्कीच संभ्रम आहे, हे निश्चित ! तसे पाहिले तर चंद्रशेखर बावनकुळे हा अगदी सडेतोड नेता. स्वतःच्या अंगलट येत असेल तर स्पष्ट बोलून मोकळा होणारा.. जयंत पाटील यांची भेट झाली, बावनकुळेंनी स्पष्टच सांगून टाकले आहे. ते एवढेच म्हणाले, की जयंत पाटील यांनी माझी अधिकृतपणे वेळ घेऊन शासकीय बंगल्यावर भेट घेतली. यावेळी राधाकृष्ण विखे पाटीलदेखील सोबत होते. मात्र, यावेळी कुठलीही राजकीय चर्चा झाली नाही.

### सांगलीतील प्रश्नांबाबत होती म्हणे भेट !

सांगली परिसरातील महसूल खात्याशी संबंधित १४ प्रश्न आणि त्या संदर्भातील समस्या घेऊन जयंत पाटील भेटले, अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांच्या सर्व प्रश्नांची सोडवणूक होईल. यासंदर्भात बैठक घेण्याचे मान्य केले, राजकीय विषयावर आम्ही बोललो नाही, असे सांगून बावनकुळे मोकळे झाले.

### शरद पवारांचा 'वजीर' भाजपच्या गळाला ?

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत धक्कादायक निकाल लागल्यानंतर महाविकास आघाडीला मोठा फटका बसणार, हे आता सिद्ध झाले आहे. शिवसेनेच्या दोन्ही गटांपैकी उद्धव ठाकरेंचा गट आणि राष्ट्रवादीच्या दोन गटांपैकी शरद पवार यांचा गट अडचणीत सापडला असून त्यांना घरघर लागली आहे.. त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला आहे! लोकसभेच्या वेळी नऊ खासदार निवडून आल्यामुळे शरद पवार गटाला चांगलीच ताकद मिळाली होती. पण, विधानसभेच्या वेळी त्यांची दाणादाण उडाली आणि त्यातच रोहित पवार आणि जयंत पाटील यांच्यातील मतभेद चव्हाट्यावर आल्यामुळे जयंतराव हे पक्ष सोडून जाणार, हे जवळजवळ निश्चित मानले जात आहे. थोडक्यात, शरद पवार यांचा 'वजीर' च भाजपाच्या गळाला लागणार, अशी चर्चा पुढे येऊ लागली. जयंतराव देखील गेल्या काही महिन्यापासून मौन बाळगून आहेत. राज्यात अनेक घटना घडत असताना सुद्धा ते कोणत्याही घटनेवर प्रतिक्रिया देत नाहीत. अशातच मध्यंतरी सांगलीतील एका कार्यक्रमात त्यांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांच्या कार्यक्रमाला हजेरी लावली होती आणि त्यांच्याबरोबर दिलखुलास चर्चाही झाल्याचे सर्वांनी पाहिले. जयंतराव यांनी भाजपची कास धरली, तर शरद पवार गटासाठी तो एक मोठा धक्का असून त्या भूकंपातून सावरण्यासाठी शरद पवार गटाला बरेच दिवस लागतील, हे आता लवकरच समजेल. दोन पक्षांच्या डगरीवर हात ठेवून बसलेले जयंतराव कोणता निर्णय घेतात, याकडे मात्र संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष आहे, हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राज्यातील दिव्यांग युवकांना रोजगार मिळणार!

## आगामी पाच वर्षांत नोंदणीकृत दिव्यांगांना युडीआयडी : मुख्यमंत्री

।परभणी।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राज्यातील दिव्यांग युवांना प्रशिक्षण देवून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांचे आर्थिक स्वावलंबन होवून रोजगाराच्या संधी दिव्यांगानाही उपलब्ध होण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. या अनुषंगाने राज्यातील दिव्यांगाना कौशल्ययुक्त प्रशिक्षण देवून रोजगार व स्वयंरोजगारासाठी आगामी पाच वर्षांत नोंदणीकृत दिव्यांगांना युडीआयडी देणे. राज्य व केंद्र शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी शासन प्रयत्नशील असून यामध्ये स्वयंसेवी संस्था देखील दिव्यांगांच्या विकासासाठी पुढे येत आहेत.**



युथ फॉर जॉब्स' संस्था व राज्य शासन लवकरच सामंजस्य करार करणार आहे. रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी 'युथ फॉर जॉब्स' ही संस्था प्राथमिक टप्प्यात विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात शासनास सहकार्य करणार आहे आगामी काळात या कामाची व्यापकता वाढवून राज्यभर या कामाला राज्य शासन गती देणार आहे यामुळे दिव्यांग युवकांना रोजगार मिळतील असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नैसर्गिकरित्या किंवा अपघाताने अपंगत्व आलेल्या समाजातील दिव्यांग व्यक्तींना त्यांचे हक्क प्राप्त करून देणे आणि त्यांच्यासाठी जाहीर केलेल्या योजनांचा त्यांना पूर्ण लाभ मिळवून देणे यासाठी शासन नेहमी आग्रही असते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'विकसित भारत' चे स्वप्न साकार करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना आणि निर्णय घेतले असून. कौशल्यपूर्ण शिक्षणातून अधिकाधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी कौशल्य विकास विभागाची स्थापना केली. याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य ही अनेक महत्त्वपूर्ण निर्णय युवांच्या दृष्टीने घेत आहे. 'युथ फॉर जॉब्स' संस्थेच्या संस्थापिका तथा अध्यक्ष मीरा शेणॉय यांच्या संस्थेने केंद्र शासनाच्या सहकार्याने गडचिरोली जिल्हा प्रशासनासोबत दिव्यांग युवांना रोजगार वाढीसाठी अत्यंत उत्कृष्टरित्या काम केले आहे. ज्या व्यक्ती दिव्यांग आहेत त्यांचे दिव्यांगत्व लक्षात घेऊन त्यांना प्रशिक्षण दिले जाते. रोजगार मेळावे आयोजित करून दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार उद्योग क्षेत्रातील मागणी लक्षात घेवून आवश्यक असे मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाते. रोजगार देणाऱ्या खाजगी संस्थांमध्ये लाईफस्टाईल इंटरनॅशनल, आदित्य बिर्ला फॅशन, रिलायन्स ट्रेंड्स, आयआयएफएल, लक्ष हॉस्पिटल, मीलन कॉफी हाऊस, एचपीसीएल, बीपीसीएल, सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, लोकल ऑटोमोबाईल डीलर्स, दिशा मेन पॉवर अँड सिक्युरिटी या वेगवेगळ्या खाजगी संस्था रोजगार देण्यासाठी पुढे येत आहेत. तसेच जे नोकरी करू शकत नाहीत. त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देवून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. हेच मॉडेल महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात सुरू करून दिव्यांगासाठी रोजगाराच्या व निर्माण होतील. आजच्या युवाकडे पदवी आहे पण उद्योग क्षेत्रात आवश्यक असलेले प्रशिक्षण देवून उद्योग क्षेत्राला कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्माण करून रोजगाराच्या संधी निर्माण होतील.युथ फॉर जॉब्स' संस्था व राज्य शासन लवकरच सामंजस्य करार करणार आहे. रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी 'युथ फॉर जॉब्स' ही संस्था प्राथमिक टप्प्यात विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात शासनास सहकार्य करणार आहे आगामी काळात या कामाची व्यापकता वाढवून राज्यभर या कामाला राज्य शासन गती देणार आहे यामुळे दिव्यांग युवकांना रोजगार मिळतील असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

### कौशल्य विकास विभागाची स्थापना

नैसर्गिकरित्या किंवा अपघाताने अपंगत्व आलेल्या समाजातील दिव्यांग व्यक्तींना त्यांचे हक्क प्राप्त करून देणे आणि त्यांच्यासाठी जाहीर केलेल्या योजनांचा त्यांना पूर्ण लाभ मिळवून देणे यासाठी शासन नेहमी आग्रही असते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'विकसित भारत' चे स्वप्न साकार करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना आणि निर्णय घेतले असून. कौशल्यपूर्ण शिक्षणातून अधिकाधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी कौशल्य विकास विभागाची स्थापना केली. याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य ही अनेक महत्त्वपूर्ण निर्णय युवांच्या दृष्टीने घेत आहे.

# पोलीस दलात आंदोलनाची ठिणगी !

## मागण्या प्रलंबित: कर्मचाऱ्यांच्या इशाऱ्याने गृह खाते आले शरण

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**महाराष्ट्राच्या पोलीस विभागातील सर्व कार्यालयीन कर्मचारी वर्गाची दीर्घ कालावधीपासून रखडलेली पदोन्नती तसेच इतर ३३ प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी गुरुवारी आंदोलन करण्याचा इशारा दिल्यावर त्याची तात्काळ दखल घेत पोलीस खात्याने संघटनेशी चर्चा करण्याची तयारी दाखवली आहे.**



मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांना हे निवेदन देण्यात आले आहे. २७ फेब्रुवारीला आंदोलनाच्या दिवशी सर्व कर्मचारी संपूर्ण वेळ काळे कपडे परिधान करून कामावर हजर होतील असा इशारा राज्य गृहविभाग कार्यालयीन कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने दिला होता.

जेवणाच्या वेळेत कार्यालयाच्या बाहेर मोक्याच्या ठिकाणी एकत्र येऊन मागण्यांचे फलक दर्शविण्याचे संघटनेने ठरविले होते . हे आंदोलन एक सुरुवात असून केवळ लक्ष वेधण्यासाठी असल्याने कोणीही घोषणाबाजी करणार नाहीत. पोलीस कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे काही जिव्हाळ्याचे प्रलंबित प्रश्न तसेच काही दैनंदिन प्रशासकीय स्वरुपाच्या अडचणी प्रदीर्घकाळ निर्णयाविना प्रलंबित आहेत. संघटनेच्या चार पत्रांद्वारे संघटनेने कैफियत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

परंतु, त्यासंदर्भात चर्चेची कवाडे उघडून संघटनेसह अद्याप कोणत्याही स्वरुपाची सकारात्मक चर्चा होऊ शकलेली नव्हती . प्रलंबित मागण्यांच्या सनदशीर चर्चेच्या माध्यमातून बऱ्याचशा समस्यांचे निराकरण पोलीस महासंचालक स्तरावर होईल, अशी कर्मचाऱ्यांची धारणा आहे. त्यासाठी चर्चेसाठी संधी मिळावी, यासाठी करीत असलेल्या सततच्या प्रयत्नांना अद्याप यश आलेले नाही. हे आंदोलन छेडणार असलो तरीही आंदोलनाच्या दिवसापूर्वी पोलीस महासंचालकांकडून आपल्या चर्चेला वेळ देणे व मागण्यांबाबत योग्य ती दखल घेण्यात येऊन सकारात्मक पाऊल उचलावीत, असेही कर्मचाऱ्यांनी निवेदनात म्हटले होते,आजवर कधीही पोलीस दलात संघटना किंवा आंदोलन झाले नाही हे लक्षात घेता गृह खात्याने तात्काळ पावले उचलली. राज्याचे पोलीस महानिरीक्षक प्रवीण पडवळ यांनी संघटनेला संपर्क करीत प्रलंबित प्रश्नावर येत्या ३ मार्च रोजी चर्चेची वेळ दिल्यामुळे हे उद्याचे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले आहे असे संघटनेचे अध्यक्ष गणेश देशमुख यांनी जाहीर केले आहे.

### दलाची बिघडतेय शिस्त

मागण्यांच्या पूर्ततेसाठी आंदोलन करणे हे पोलीस दलाच्या शिस्त व नियमात बसत नाही. प्रशासनाने पुढाकार घेऊन राज्य कर्मचाऱ्यांमधील एका महत्वाच्या कर्मचारी घटक समूहाच्या प्रलंबित मागण्यांबाबत योग्य निर्णय घेऊन कर्मचारी वर्गास दिलासा द्यावा, अशी अपेक्षा या निवेदनात व्यक्त केली होती.

# मी लोकप्रियेत धोनीला मागे टाकेन!

## प्रशांत किशोर यांची तमिळनाडूत मोठी घोषणा; नेमकं काय म्हणाले?

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**बिहारच्या राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेले जनसुराज पक्षाचे सुत्रधार प्रशांत किशोर हे पुन्हा चर्चेत आले आहेत. तामिळनाडूमधील अभिनेता-राजकारणी विजय याच्याबरोबर ते एका व्यासपीठावर दिसून आले. बुधवारी झालेल्या या कार्यक्रमात राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी मोठी घोषणा केली आहे. त्यांनी आपण २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत अभिनेता-राजकारणी विजय 'तमिझगा वेत्री कळघम (TVK)' पक्षाला विजय मिळवून देऊ असे किशोर म्हणाले आहेत. महाबलीपुरम येथे टीव्हीकेच्या पहिल्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात प्रशांत किशोर यांनी ही घोषणा केली.**



येथे बोलताना प्रशांत किशोर यांनी तामिळनाडू येथे आपण माजी भारतीय क्रिकेटपटू आणि भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्र सिंह धोनी याला प्रसिद्धीमध्ये मागे टाकू असेही म्हटले आहे.टीव्हीके पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना प्रशांत किशोर म्हणाले की, "तुम्ही पाहाता की एमएस धोनीच्या नावाची खूप चर्चा होते. तो एकमेव बिहारी आहे जो तामिळनाडूमध्ये माझ्यापेक्षा जास्त लोकप्रिय आहे. धोनी तामिळनाडूमध्ये प्रशांत किशोरपेक्षा जास्त लोकप्रिय आहे, पण गल्लत करू नका, पुढच्या वर्षी, जेव्हा मी योगदान देईल आणि तुम्हाला जिंकण्यास मदत करेन, तेव्हा मी लोकप्रियतेत धोनीला मागे टाकेन.""जर मी पुढच्या वर्षी टीव्हीकेला विजयी होण्यास मदत केली तर तमिळनाडूमध्ये कोण जास्त लोकप्रिय असेल? दरवेळी चेन्नई सुपर किंग्जला जिंकवून देणारा माझा बिहारी सहकारी एमएस धोनी की प्रशांत किशोर?", असा प्रश्नही त्यांनी उपस्थितांना विचारला.पुढे बोलताना प्रशांत किशोर म्हणाले की, "मला जिंकण्यासाठी माझी स्वत:ची लढाई आहे. त्यासाठी मला तामिळनाडूमधील सर्वात लोकप्रिय बिहारी बनावे लागेल. म्हणून मला चेन्नई सुपर किंग्ज संघाला जिंकवणाऱ्या धोनीशी स्पर्धा करावी लागेल. म्हणून मी टीव्हीकेला तुमच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली जिंकवेन," असेही प्रशांत किशोर म्हणाले.प्रशांत किशोर यांनी २०२१ मध्ये आपल्या राजकीय सल्लागार म्हणून काम करण्यापासून निवृत्तीची घोषणा केली होती. पण पुन्हा ते हे काम का करत आहेत याबद्दलची भूमिका स्पष्ट करताना प्रशांत किशोर म्हणाले की मृते टीव्हीकेला राजकीय पक्ष म्हणून पाहात नाहीत तर एक चळवळ म्हणून पाहातात. माझ्यासाठी ते (विजय) राजकीय नेते नाहीत. तो तामिळनाडूसाठी एक आशा आहे, त्यामुळेच मी इथे आलो आहे. टीव्हीके हा माझ्यासाठी राजकीय पक्ष नाही. एक लाखो लोकांची चळवळ आहे ज्यांना तामिळनाडू मध्ये नवीन राजकीय व्यवस्था पाहायची आहे, असेही प्रशांत किशोर म्हणाले. तामिळनाडू येथे आपण माजी भारतीय क्रिकेटपटू आणि भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्र सिंह धोनी याला प्रसिद्धीमध्ये मागे टाकू असेही म्हटले आहे.टीव्हीके पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना प्रशांत किशोर म्हणाले की, "तुम्ही पाहाता की एमएस धोनीच्या नावाची खूप चर्चा होते. धोनी तामिळनाडूमध्ये प्रशांत किशोरपेक्षा जास्त लोकप्रिय आहे, पण गल्लत करू नका, पुढच्या वर्षी, जेव्हा मी योगदान देईल आणि तुम्हाला जिंकण्यास मदत करेन, तेव्हा मी लोकप्रियतेत धोनीला मागे टाकेन.""जर मी पुढच्या वर्षी टीव्हीकेला विजयी होण्यास मदत केली तर तमिळनाडूमध्ये कोण जास्त लोकप्रिय असेल? दरवेळी चेन्नई सुपर किंग्जला जिंकवून देणारा माझा बिहारी सहकारी एमएस धोनी की प्रशांत किशोर?", असा प्रश्नही त्यांनी उपस्थितांना विचारला.पुढे बोलताना प्रशांत किशोर म्हणाले की, "मला जिंकण्यासाठी माझी स्वत:ची लढाई आहे. त्यासाठी मला तामिळनाडूमधील सर्वात लोकप्रिय बिहारी बनावे लागेल. म्हणून मला चेन्नई सुपर किंग्ज संघाला जिंकवणाऱ्या धोनीशी स्पर्धा करावी लागेल. म्हणून मी टीव्हीकेला तुमच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली जिंकवेन," असेही प्रशांत किशोर म्हणाले.प्रशांत किशोर यांनी २०२१ मध्ये आपल्या राजकीय सल्लागार म्हणून काम करण्यापासून निवृत्तीची घोषणा केली होती.

### त्यामुळेच मी इथे आलो आहे

पण पुन्हा ते हे काम का करत आहेत याबद्दलची भूमिका स्पष्ट करताना प्रशांत किशोर म्हणाले की मृते टीव्हीकेला राजकीय पक्ष म्हणून पाहात नाहीत तर एक चळवळ म्हणून पाहातात.माझ्यासाठी ते (विजय) राजकीय नेते नाहीत. तो तामिळनाडूसाठी एक आशा आहे, त्यामुळेच मी इथे आलो आहे.

# तर एअर इंडियाला ऑस्कर पुरस्कार मिळाला असता!

## एअर इंडिया कंपनीवर भाजपा नेत्याने ताशेरे ओढले : जयवीर शेरगिल

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**हवाई वाहतुकीसाठी प्रसिद्ध असलेल्या एअर इंडिया कंपनीवर भाजपा नेत्याने ताशेरे ओढले आहे. भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते जयवीर शेरगिल यांनी एअर इंडियातील सेवेबाबत नाराजी व्यक्त केली आहे. त्यांचा अलीकडील अनुभव त्यांनी एक्सद्वारे पोस्ट केला असून सर्वात वाईट एअरलाईनसाठी एअर इंडियाला ऑस्कर पुरस्कार द्यावा, अशी टीकाही त्यांनी केली.**



भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते जयवीर शेरगील एक्सवर म्हणाले, एअर इंडियाने प्रवास करतानाचा अनुभव चांगला नव्हता. या एअरलाईनने सर्व विक्रम मोडित काढले आहे. जर सर्वात वाईट एअरलाइनसाठी ऑस्कर समतुल्य पुरस्कार मिळाला असता, तर एअर इंडिया प्रत्येक श्रेणीत जिंकली असती. तुटलेल्या जागा, सर्वात वाईट कर्मचारी, वाईट ग्राउंड सपोर्ट स्टाफ.शेरगिल यांनी एक्सवर आपली दुर्दशा सांगितल्यानंतर, एअर इंडियाने गैरसोयीबद्दल माफी मागितली.केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनीही एअर इंडियावर ताशेरे ओढले होते. भोपाळ ते नवी दिल्ली या त्यांच्या अलिकडच्या विमान प्रवासात (एआय४३६) त्यांना नादुरुस्त सीट दिल्याबद्दल एअर इंडियावर टीका केली होती. त्यानंतर काहीच दिवसांनी शेरगिल यांनी टीका केली. चौहान म्हणाले की, पूर्ण भाडे आकारले जात असतानाही असा अप्रिय अनुभव प्रवाशांची फसवणूक करण्यासारखा आहे."मला 8C क्रमांकाची सीट देण्यात आली होती. जेव्हा मी माझ्या सीटवर पोहोचलो आणि बसलो तेव्हा मला आढळले की ती तुटलेली आहे. त्यावर बसणं शक्य नव्हतं", चौहान यांनी X वरील एका लांब पोस्टमध्ये म्हटले आहे. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री म्हणाले की जेव्हा त्यांनी एअरलाइन कर्मचाऱ्यांशी संपर्क साधला तेव्हा त्यांनी सांगितले की व्यवस्थापनाला सीटच्या स्थितीची माहिती देण्यात आली आहे.

### मंत्र्यांशी बोलून कारवाईचे आश्वासन

जेव्हा मी विमान कर्मचाऱ्यांना विचारले तेव्हा त्यांनी मला सांगितले की व्यवस्थापनाला सीटच्या स्थितीबद्दल आधीच माहिती देण्यात आली होती.चौहान यांची पोस्ट व्हायरल होताच, नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी मंत्र्यांशी बोलून कारवाईचे आश्वासन दिले. विमान वाहतूक नियामक, डीजीसीए, यांना या प्रकरणाची चौकशी करण्यास सांगण्यात आले आहे.

# मराठी भाषेचे अभिजातपण टिकवण्यासाठी काय करता येईल?

**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यावा, ही मागणी मान्य करत केंद्र सरकारने मराठीला अभिजात दर्जा देण्याच्या प्रस्तावास ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मंजुरी दिली. मराठीसह पाली, प्राकृत, आसामी व बंगाली अशा एकूण पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. संपूर्ण महाराष्ट्राला व जगभरातील मराठीजनांना अभिमान वाटावा अशी ही गोष्ट आहे. देशात आतापर्यंत सहा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे.**



प्रा. जयेश म्हात्रे
मराठी विभाग,
जे.एस. एम. कॉलेज, अलिबाग

तमिळ भाषेला सर्वात आधी २००४ साली अभिजात दर्जा प्रदान करण्यात आला. त्यापाठोपाठ संस्कृत (२००५), कन्नड (२००८), तेलुगु (२००८), मल्याळम (२०१३) आणि ओडिया (२०१४) या भाषांना अभिजात दर्जा बहाल केला गेला. हा दर्जा मिळणे म्हणजे भाषेच्या समृद्धीवर राजमान्यतेची मोहोर उमटणे होय..अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ती भाषा किमान दीड ते दोन हजार वर्षे प्राचीन असायला हवी. त्या भाषेला मूळ त्याच भाषेतीलः अनुवादित नसलेल्या समृद्ध साहित्याची परंपरा असावी. त्या भाषेचा प्रवास अखंडित असावा आणि प्राचीन व सध्याच्या भाषेतील नाते सुस्पष्ट असावे, असे निकष आहेत, मराठी भाषेने हे सर्व निकष पूर्ण केले आहेत. अभिजात दर्जा असलेल्या भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी सुमारे २५०-३०० कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते. भाषा भवन उभारणे, त्या भाषेतील ग्रंथ व साहित्याचा प्रसार करणे, ग्रंथालये उभारणे, देशभरातील विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषेचा प्रसार यासह इतर प्रकल्पांसाठी आर्थिक पाठबळ दिले जाते. प्राचीन ग्रंथाचा अनुवाद केला जातो. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यास त्या भाषेतील विद्वानांसाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले जातात. सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडिजची स्थापना केली जाते. प्रत्येक विद्यापीठात त्या-त्या भाषेचा अभ्यास करण्यासाठी विशेष केंद्र उभारले जाते. या पार्श्वभूमीवर मराठी भाषेचे अभिजातपण टिकवण्यासाठी आम्हाला काय करता येईल? याद्दष्टीने येथे काही मुद्दे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.शिलालेख, ताम्रपट यांसारख्या ऐतिहासिक, पुरातत्वीय पुराव्यांचे जतन व संवर्धनमराठी भाषेची प्राचीनता जाणण्यासाठी शिलालेख, ताम्रपट यांसारखे ऐतिहासिक, पुरातत्वीय पुरावे उपयोगी ठरतात. आक्षीचा शिलालेख मराठी भाषेतील ज्ञात असलेला सर्वांत प्राचीन शिलालेख असल्याचे मानले जाते. या शिलालेखाचे जतन, संवर्धन व्हावे यासाठीही स्थानिक भाषाप्रेमी, संघटना यांना कित्येक वर्षे झगडावे लागले. या सगळ्या दिरंगाईमुळे या शिलालेखावरील कोरलेल्या ओळी पूर्णपणे झिजून गेल्या आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यात या कोरीव लेखांचे पुरावे महत्त्वपूर्ण ठरले आहेत. शिलालेख, ताम्रपट, दानपत्रे, भूर्जपत्रे, नाणी यांसारखे ऐतिहासिक, पुरातत्त्वीय अभिलेख जतन करणे हे मराठीचे अभिजातपण टिकविण्याच्या द्दष्टीने महत्वाचे आहे. कोशवाङ्मय निर्मितीची गरजकोशवाङ्मय हे संस्कृती व विचारांचे संचित असते. मराठीतील कोशवाङ्मय समृध्द आहे. परंतु मराठीच्या विविध बोलींचे शब्दकोश तयार होणे गरजेचे आहे. त्यासोबतच संत साहित्य, पंडिती साहित्य, शाहिरी साहित्य, बखर गद्य, लोकसाहित्य, अव्वल इंग्रजी काळातील साहित्य यांचे शब्दकोश व संज्ञा-संकल्पना कोश तयार करणे गरजेचे आहे. विश्वकोशातील नोंदी अद्ययावत करणे गरजेचे आहे. मध्ययुगीन मराठी साहित्य नव्या पिढ्यांपर्यंत पोहचवायचे असेल तर हे साहित्य समजून घेण्याच्या द्दष्टीने कोशवाङ्मय निर्मितीची गरज आहे. ग्रामीण, दलित, आदिवासी साहित्यात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील बोलींचा वापर होतो आहे. या साहित्यातून जे गाव-खेड्यातील शब्द वापरले गेले आहेत हे शब्द जर कोणत्या ना कोणत्या मागनि प्रमाण मराठीत रूढ झाले तर मराठीच्या शब्दसंग्रहात नक्कीच भर पडेल. संतांचे भक्ती साहित्य, पंडितांचे आख्यान साहित्य, शाहिरांचे लावणी व पोवाडे, इतिहासाची नोंद घेणारे बखर साहित्य या सर्व साहित्याने मराठी साहित्याचा प्रवाह मध्ययुगीन काळात अखंड चालू ठेवला. या साहित्याचे पुनरुज्जीवन होणे ही काळाची गरज आहे. आजच्या पिढीपर्यंत हे साहित्य नव्या माध्यमांतून पोहोचवणे गरजेचे आहे. आजची तरुण पिढी प्रत्यक्ष ग्रंथालयात जाऊन पुस्तके वाचेल याची शाश्वती नसताना समाजमाध्यमांतून उपलब्ध असलेले विविध पर्याय वापरून हे साहित्य द्दकश्राव्य माध्यमातून आजच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. मराठीला आधुनिक रूप प्राप्त करून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेल्या महात्मा फुले, बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, लोकमान्य टिळक, विष्णुशास्त्री चिपळूणकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा विचारवंतांचे वैचारिक मराठी वाङ्मय नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे.जागतिकीकरणाच्या काळात स्थानिक-प्रादेशिक भाषांवर इंग्रजीसारख्या भाषेचे आक्रमण होत असताना जी मराठी भाषा आजच्या पिढीपर्यंत पोहोचत आहे ती इंग्रजी-हिंदी यांच्या प्रभावातून तयार झालेली अत्यंत संमिश्र अशी मराठी भाषा आहे. साधारणपणे १९९० च्या दशकामध्ये त्यावेळच्च्या वैचारिक साहित्यातून, वृत्तपत्रांतून, अग्रलेखांमधून मराठी भाषेचे जे स्वरूप वाचायला मिळत होते ते नव्या पिढीपर्यंत पोहोचण्याची गरज आहे. अर्थात ही जबाबदारी साहित्यिकांची जशी आहे तशी प्रसारमाध्यमांचीदेखील आहे. मुद्रित व द्दकश्राव्य प्रसारमाध्यमांतून ज्या प्रकारची मराठी भाषा वापरली जात आहे. त्यामुळे दैनंदिन वापरातील मराठी भाषेवर मोठा परिणाम झाल्याचे दिसून येते. तरुण पिढी समाजमाध्यमांचा सतत वापर करत असते. या समाजमाध्यमांवर ज्या प्रकारचे मराठी त्यांना वाचायला, ऐकायला मिळते त्यातूनच या तरुण पिढीच्या मराठी भाषेची घडण होत आहे. मराठीचे निर्भेळ, प्रौढ व प्रगल्भ रूप जर या तरुण पिढीच्या कानावर पडायचे असेल तर समाजमाध्यमांमधील मराठी भाषेवर, तिच्या वापरावर नियंत्रण आणणे गरजेचे आहे. एरवी मराठी भाषा गौरव दिनाला मराठी भाषेचा कैवार घेऊन दिवसभर वेगवेगळे कार्यक्रम प्रसारित करणाऱ्या वृत्तवाहिन्या इतर दिवशी मात्र कोणतेही भाषिक भान न राखता मराठी भाषेची अत्यंत क्रूरपणे मोडतोड करून बातम्यांचे प्रसारण करत असतात. आज जी दैनंदिन जीवनात, व्यवहारात मराठी भाषा बोलली जाते ती पाहता या भाषेवर प्रसारमाध्यमे व समाजमाध्यमांमध्ये वापरल्या जाणाऱ्या मराठी भाषेचा परिणाम असल्याचे दिसून येते. सरकारी नियंत्रणात असलेल्या वृत्तवाहिन्यांवर ज्या प्रकारे आशय व भाषेच्या बाबतीत सरकारी बंधने असतात त्याप्रमाणे समाजमाध्यमे व खाजगी वृत्तवाहिन्यांवरील मराठी भाषेच्या वापरावरदेखील नियंत्रण आणणे गरजेचे आहे. एखाद्या भाषेला ज्ञानभाषा म्हणायचे असेल तर तिच्यात मोठ्या संख्येने पारिभाषिक शब्द असायला हवेत. परकीय भाषेतून एखादी संकल्पना स्वीकारत असताना तिच्यासाठी योग्य पर्यायी संज्ञा, पारिभाषिक शब्द तात्काळ तयार करून सगळीकडे वापरणे गरजेचे आहे. परकीय भाषेतील शब्द आपल्याकडे रुजल्यानंतर त्याच्यासाठी पर्यायी शब्द तयार करून तो रुजवण्याचे प्रयत्न निष्फळच ठरणार. 'मोबाईल' हा शब्द रूढ झाल्यानंतर त्याच्यासाठी चलभाष, भ्रमणध्वनी असे शब्द रूढ करण्याचा आटापिटा केवळ व्यर्थ आहे. परकीय देशांमधून एखादे तंत्रज्ञान आपल्याकडे घेत असताना ते आपल्या भाषेतून स्वीकारायला हवे. तरच आपल्या भाषेत नवीन शब्दांची भर पडेल. मोबाईलसारख्या एका वस्तूने मराठीत जवळजवळ ५० इंग्रजी शब्दांची भर घातली आहे. याच शब्दांना जर आपण मराठीत पर्यायी शब्द तयार केले असते, तर मराठीत सुमारे ५० नवीन शब्दांची भर पडली असती. परंतु भाषेबद्दलचा आपला द्दष्टिकोन केवळ भावनिक व अस्मितेकडे जाणारा असल्यामुळे आपण हे करू शकलो नाही. मराठीत एका शब्दासाठी अनेक पर्यायी शब्द उपलब्ध आहेत. मात्र त्या एका शब्दाची जागा इंग्रजी शब्दाने घेतल्याने ते वेगवेगळे पर्यायी शब्द आज नष्ट झालेले आहेत. विविध भारतीय भाषांतील व परदेशी भाषांतील दर्जेदार समृद्ध साहित्याचे मराठीमध्ये भाषांतर होणे गरजेचे आहे. या दर्जेदार साहित्याच्या भाषांतराच्या निमित्ताने मराठीमध्ये काही नवीन शब्द तयार होऊ शकतील. कित्येक परभाषेतील संकल्पना अचूकपणे नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी भाषांतरकाराला काही वेळा नवीन शब्द घडवावे लागतात. असे नवे शब्द घडवण्यासाठी मुळात अशा साहित्याची भाषांतरे होणे गरजेचे आहे. ते फार होताना दिसत नाही. वाचनसंस्कृतीचा हास होतो आहे असे केवळ बोलून उपयोग होणार नाही. नव्या पिढीच्या वाचनाच्या सवयी बदललेल्या आहेत. पुस्तक हातात घेऊन वाचण्यापेक्षा पुस्तके ऐकण्याला प्राधान्य देणारी ही पिढी आहे. आम्हाला त्या द्दष्टीने प्रयत्न करावे लागतील, आमची ग्रंथालये आम्हाला अद्ययावत करणे गरजेचे आहे. ग्रंथालयांमध्ये या प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. काय वाचावे, कसे वाचावे, काय वाचू नये याबद्दलचे भान आजच्या पिढीला करून देणे गरजेचे आहे. संशोधनाचा दर्जा वाढवण्याची गरज मराठी भाषेतून होणाऱ्या संशोधनाचा दर्जा वाढवण्याची अत्यंत गरज आहे. महाविद्यालयीन व विद्यापीठ पातळीवर होणारे संशोधन पाहता सेवेतील विविध लाभ योग्य वेळेत प्राप्त करून घेण्यासाठी शोधनिबंध लिहिणाऱ्या व पीएच.डी. पदवी प्राप्त करणाऱ्या प्राध्यापकांची संख्या अधिक दिसते. असे करताना अपवाद वगळता अत्यंत सुमार दर्जाचे संशोधन विद्यापीठपातळीवर देखील होत असलेले दिसते. मराठी भाषेला अत्यंत चिकित्सक समीक्षकांची परंपरा लाभलेली आहे. या सर्व समीक्षकांनी त्या-त्या काळातील शास्त्रीय मराठीची जडणघडण केलेली आहे. आज असे समीक्षक नाहीत, असे म्हणता येणार नाही. परंतु ज्या पद्धतीचे शोधनिबंध किंवा पीएच.डी.चे प्रबंध आज लिहिले जात आहेत ते पाहता नव्या पिढीसमोर आपण काय आदर्श उभा करणार आहोत याचा विचार करण्याची गरज आहे. या सर्व शोधनिबंधांतून व प्रबंधांमधून ज्या शास्त्रीय भाषेचा वापर व्हायला हवा त्याचा अभाव दिसून येतो.

## बोली जिवंत ठेवण्याची गरज

मराठी भाषा जर समृद्ध करायची असेल तर मराठीच्या सर्व बोली जिवंत ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. बोलीमधील समृद्ध शाब्दिक भांडार प्रमाण मराठीकडे वळवणे अत्यंत निकडीचे आहे. याकरिता शासनस्तरावर व विद्यापीठ पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. आज विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांमध्ये काही बोलींचा समावेश असलेला आपल्याला दिसून येतो. परंतु ती गोष्ट केवळ अभ्यासक्रमापुरतीच मर्यादित राहते. एका मोठ्या जनसमुदायापर्यंत जर आपल्याला विविध बोली पोहोचवायच्या असतील तर समाज माध्यमांचा वापर करावा लागेल, बोलींमधील लोकगीते, लोककथा, संवाद यांच्या ध्वनीचित्रफिती तयार करून त्या समाजमाध्यमांवरून प्रसारित करण्याचा प्रयत्न शासनाकडूनच व्हायला हवा.शिक्षणाचा उद्देश केवळ नोकरी व अर्थाजन समजल्या जाण्याच्या आजच्या काळामध्ये अगदी प्राथमिक शाळेपासूनच भाषा विषयांकडे दुर्लक्ष करण्याचा द्दष्टिकोन पालकांमध्ये आणि मग स्वाभाविकपणे विद्यार्थ्यांमध्ये असल्याचे दिसते.

# मुंबईचा युपीवर दणदणीत विजय!

## MI गुणतालिकेत पहिल्या स्थानी; मॅथ्यूज-स्किव्हर ब्रंटची शतकी भागीदारी

। दुबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबई इंडियन्सच्या संघाने उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर युपीच्या संघाचा एकतर्फी पराभव करत ८ विकेट्सने सामना जिंकला. मुंबई संघाच्या नताली स्किव्हर ब्रंट आणि हिली मॅथ्यूज यांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर मुंबईने १४३ धावांचे लक्ष्य सहज गाठले. या विजयासह मुंबईचा संघ आता वुमन्स प्रीमियर लीगच्या गुणतालिकेत पहिल्या स्थानी पोहोचला आहे.**



मुंबईची कर्णधार हरमनप्रीत कौरने या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना यूपी संघाने २० षटकांत ९ गडी गमावून १४२ धावा केल्या. मुंबई संघाने १४३ धावांचे लक्ष्य ८ विकेट्स राखून पार करत गुणतालिकेचा संपूर्ण खेळच बदलून टाकला आहे.नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या यूपी वॉरियर्सने सलामीच्या जोडीत मोठा फेरबदल केला. ज्याचा संघाला चांगलाच फायदा झाला. पण मधल्या फळीतील फलंदाज चांगली कामगिरी करण्यात अपयशी ठरले. ग्रेस हॅरिसने ४५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. तिला साथ देत वृंदा दिनेशनेही ३३ धावा केल्या. युपीने ८१ धावांत फक्त २ विकेट्स गमावले होते. पण ग्रेस हॅरिसची विकेट गेल्यानंतर युपी संघाच्या धावांना ब्रेक लागला आणि मुंबईच्या गोलदाजांनी सामन्यात पुनरागमन केले. मुंबईकडून नॅट स्किव्हर ब्रंटने ३ विकेट्स, शबनब इस्माईल आणि संस्कृती गुप्ताने २ विकेट्स तर हिली आणि अमेलिया केरने १-१ विकेट घेतली. वादळी सुरूवात होऊनही यूपीचा संघ १४३ धावाच करू शकला.युपीने दिलेल्या १४३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करतान मुंबईने ६ धावांवर यास्तिका भाटियाची पहिली विकेट गमावली. यानंतर जगातील पहिल्या क्रमांकाची व्हाईट बॉल अष्टपैलू खेळाडू हिली मॅथ्यूज धावा काढण्यासाठी धडपडताना दिसली. पण अखेरीस तिने मोठे प्रयत्न करत आपला फॉर्म परत मिळवत ५० चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ५९ धावांची उत्कृष्ट खेळी केली. शानदार फॉर्मात असलेल्या नॅट स्किव्हर ब्रंटने ४४ चेंडूत १३ चौकारांसह ७५ धावांची खेळी करत तिला चांगली साथ दिली. तर हिली बाद झाल्यानंतर हरमनप्रीत कौरने विजयी चौकार लगावत १७व्या षटकातच संघाला विजय मिळवून दिला.मुंबईची कर्णधार हरमनप्रीत कौरने या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना यूपी संघाने २० षटकांत ९ गडी गमावून १४२ धावा केल्या. मुंबई संघाने १४३ धावांचे लक्ष्य ८ विकेट्स राखून पार करत गुणतालिकेचा संपूर्ण खेळच बदलून टाकला आहे.

### युपीच्या संघाचा एकतर्फी पराभव

ज्याचा संघाला चांगलाच फायदा झाला. पण मधल्या फळीतील फलंदाज चांगली कामगिरी करण्यात अपयशी ठरले. ग्रेस हॅरिसने ४५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. तिला साथ देत वृंदा दिनेशनेही ३३ धावा केल्या. युपीने ८१ धावांत फक्त २ विकेट्स गमावले होते. पण ग्रेस हॅरिसची विकेट गेल्यानंतर युपी संघाच्या धावांना ब्रेक लागला आणि मुंबईच्या गोलदाजांनी सामन्यात पुनरागमन केले. मुंबईकडून नॅट स्किव्हर ब्रंटने ३ विकेट्स, शबनब इस्माईल आणि संस्कृती गुप्ताने २ विकेट्स तर हिली आणि अमेलिया केरने १-१ विकेट घेतली. वादळी सुरूवात होऊनही यूपीचा संघ १४३ धावाच करू शकला.युपीने दिलेल्या १४३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करतान मुंबईने ६ धावांवर यास्तिका भाटियाची पहिली विकेट गमावली. मुंबई इंडियन्सच्या संघाने उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर युपीच्या संघाचा एकतर्फी पराभव करत ८ विकेट्सने सामना जिंकला.

# अफगाणिस्तानचा इंग्लंडवर थरारक विजय

## इंग्लिश संघाला चॅम्पियन्स ट्रॉफीतून केलं बाहेर, झादरान विजयाचा हिरो

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अफगाणिस्तान संघाचा आयसीसी स्पर्धेत अजून एक मोठा उलटफेर केला आहे. अफगाणिस्तानने इंग्लंडचा चॅम्पियन्स ट्रॉफीत ८ विकेट्सने पराभव करत मोठा अपसेट केला. यासह इंग्लंडचे चॅम्पियन्स ट्रॉफीतील आव्हान संपुष्टात आले आहे.**



तर अफगाणिस्तानचा संघ अजूनही उपांत्य फेरी गाठण्याच्या शर्यतीत कायम आहे. अफगाणिस्तानकडून अझमतुल्ला उमरझाईने ५ विकेट्स तर इब्राहिम झादरानने १७७ धावांची खेळी केली, जे संघाच्या विजयाचे हिरो ठरले.इब्राहिम झद्रानचे (१७७) शानदार शतक आणि अझमतुल्ला ओमरझाई (४१ धावा आणि ५ विकेट) याच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर अफगाणिस्तानने शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या या सामन्यात इंग्लिश संघाचा अवघ्या ८ धावांच्या फरकाने पराभव केला. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि अफगाणिस्तानने पहिल्यांदा आयसीसी स्पर्धेत ३०० धावांचा पल्ला पार केला. यासह अफगाणिस्तानने ३२५ धावांचा टप्पा गाठला. इब्राहिम झादरानची १७७ धावांची वादळी खेळीने संघाच्या या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. अखेरच्या दोन षटकांमध्ये म्हणजेच १२ चेंडूत इंग्लंडला १६ धावांची गरज होती. फजलहकने त्या षटकात आर्चरला बाद करत ३ धावा दिल्या. तर अखेरच्या षटकात उमरझाईने प्रत्येक चेंडूवर एकेक धाव देत पाचव्या चेंडूवर आदिल रशीदला बाद करत इंग्लिश संघाला सर्वबाद केले आणि संघाला दणदणीत विजय मिळवून दिला.लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात दोन्ही संघांची सुरुवात खराब झाली. पण अफगाणिस्तानने कमालीचं पुनरागमन करत ३२५ धावा केल्या. झादरानने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये अफगाणिस्तानसाठी पहिलं शतक झळकावले आणि त्यानंतर या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात मोठी खेळी खेळताना १७७ धावा केल्या. अफगाणिस्तानने ९व्या षटकातच संघाने ३ विकेट गमावल्या. हे तीन विकेट स्टार वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने घेत अफगाणिस्तानला अडचणीत आणले. पण इथून इंग्लंडच्या गोलंदाजीची अवस्था बिकट झाली आणि अफगाणिस्तानने पुनरागमन केले.

### रोहित आणि विराटला मोठा धक्का

अफगाणिस्तानने ३७ धावांत ३ विकेट गमावल्यानंतर इब्राहिम झादरानने कर्णधार हशमतुल्ला शाहिदीबरोबर शतकी भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. शाहीदीने ४० धावा केल्या. तर यानंतर अझमतुल्ला ओमरझाईने ४१ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. यानंतर मोहम्मद नबीने तर इंग्लिश संघाची धुलाई करत २४ चेंडूत ३ षटकार आणि २ चौकारांसह ४० धावा केल्या. झादरान आणि नबीने २०० च्या स्ट्राईक रेटने ५० चेंडूत शतकी भागीदारी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. इंग्लंडकडून आर्चरने ३ विकेट्स, ओव्हरटन, रशीदने १-१ तर लिव्हिंगस्टोनने २ विकेट्स घेतले.अफगाणिस्तानने दिलेल्या ३२६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरूवात थोडी चांगली झाली, पण संघाचे सलामीवीर मोठी खेळी करू शकले नाही. सॉल्ट १२ धावा तर जेमी स्मिथ ९ धावा करत बाद झाले. जो रूटने १२० धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, पण संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकले नाही. हॅरी ब्रुक २५ धावा, बटलर ३८ धावा, लिव्हिंगस्टोन १० धावा तर ओव्हरटनने ३२ धावा केल्या. पण अफगाणिस्तानच्या भेदक गोलंदाजीपुढे संघ ३१७ धावांवर सर्वबाद झाला. अफगाणिस्तानकडून अझमतुल्ला ओमरझाईने ५ विकेट्स, नबीने २ विकेट्स, तर फजलहक फारूकीने १, नूर अहमदने १ तर गुलबदीन नायबने १ विकेट घेतली.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरुवार ।

। दि. 27 फेब्रुवारी 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

एसबीपीआयएम निगडीमध्ये

# एसबीपीआयएम निगडीमध्ये युवोत्सव क्रीडा महोत्सव

## आज सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णींच्या हस्ते उद्घाटन

। पिंपरी ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**निगडी येथील पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचलित एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये "युवोत्सव २०२५" या आंतर महाविद्यालयीन भव्य क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन गुरुवारी (दि.२७) सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.**




ESTD. 2014 YUVOTSAV 10TH EDITION

शनिवारी (दि. १ मार्च) मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. युवोत्सव स्पर्धेच्या आयोजनाचे हे दहावे वर्ष आहे. या स्पर्धेमध्ये फुटबॉल, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बॉक्स क्रिकेट या स्पर्धांचा समावेश आहे. युवोत्सव क्रीडा स्पर्धेमध्ये पुणे परिसरातील पदवी आणि पदव्युत्तर महाविद्यालयामधील संघ सहभागी होणार आहेत. विजयी संघांना आकर्षक बक्षिसे व रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत, अशी माहिती एसबीपीएमच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी प्रसिद्धीस दिली आहे. स्पर्धेचे आयोजनात डॉ. अनिषकुमार कारिया, डॉ. काजल माहेश्वरी, डॉ. अमरीश पद्मा यांनी सहभाग घेतला आहे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली युवोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.


# दापोडीच्या गणेश इंटरनॅशनल स्कूलला सीबीएसईची मान्यता

## शाळेच्या शैक्षणिक प्रवासातील हा एक मोठा महत्त्वाचा टप्पा मानला जातोय

। दापोडी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दापोडीतील गणेश इंटरनॅशनल स्कूलला केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची (सीबीएसई) अधिकृत मान्यता सीबीएसई मान्यता क्रमांक: 1131459 नुकतीच प्राप्त झाली आहे. ही मान्यता 01 एप्रिल 2025 ते 31 मार्च 2030 या कालावधीसाठी देण्यात आली असून, शाळेच्या शैक्षणिक प्रवासातील हा एक मोठा महत्त्वाचा टप्पा आहे.**

GIS LEARN TO LEAD DAPODI




ही मन्याता एस. एस. पी. ग्रुप ऑफ इंस्टीट्यूटचे अध्यक्ष एस.बी. पाटील यांचे अमूल्य योगदान आहे. या यशाचे श्रेय संस्थेचे संचालक एस.बी. पाटील, संस्थेचे विश्वस्त गणेश पाटील, आकाश पाटील, मंगेश पाटील, सचिव चंद्रकांत पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रकाश गायकवाड, सहयोगी संचालक सुनील शेवाळे, शाळेच्या मुख्याध्यापिका सिओना त्रिभुवन, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकवर्ग यांच्या अथक परिश्रमाला जाते. शाळेने गेल्या काही वर्षात अत्याधुनिक शिक्षण सुविधा, डिजिटल वर्गखोल्या, प्रयोगशाळा आणि खेळासारख्या उपक्रमांवर विशेष भर दिला आहे.

सीबीएसई मान्यतेमुळे विद्यार्थ्यांना आता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक संधी उपलब्ध होतील. आधुनिक शिक्षण प्रणाली, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांसाठी सर्वोत्तम शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याचा शाळेचा संकल्प आहे. शाळेचा पुढील उद्देश विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक सुविधा, संशोधनपर शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. गणेश इंटरनॅशनल स्कूल आता CBSE मान्यतेसह आणखी अधिक जोमाने आणि आत्मविश्वासाने पुढे जाणार आहे.

ही मान्यता मिळवण्यासाठी योगदान दिलेल्या सर्व शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार. शिक्षण क्षेत्रात आणखी नवे उच्चांक गाठण्यासाठी गणेश इंटरनॅशनल स्कूल सज्ज आहे.


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
TOMORROW'S
LEADERS
ARE MADE HERE
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
779 676 7292
BRANCHES AT: DHANORE | CHARHOLI | MOSHI


WTE
Provider of Sustainable
Water and Waste Water Treatment Solution Globally


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!